# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. ४२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१८/०७/२०१६.

**१) संगनमत करुन शिविगाळ देवुन मारण्या पिटण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १६/०७/२०१६ रोजी १८.३०ते १९.०० वा. दर. चारही आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १नी नामदेव आसाराम थाटकर वय ४५ वर्ष, ''हा रोडवर मला पाहुन थुकंला'' असे म्हणुन शिविगाळ व भांडण केली. आरोपी क्र. २ नी लोखंडी कातीने डावे हाताचे मनगटावर मारुन जखमी केले. आरोपी क्र. ३ नी त्यांना विट फेकुन मारली, ती विट त्यांच्या मुलाच्या कमरेवर लागली.असुन आरोपी क्र. ४ नी त्यांच्या पत्नी सौ. छाया हिला काठीने मारहान केली व भांडणात आरोपीतांनी शिविगाळ करुन मारण्या—पिटण्याची धमकी दिली. असे त्यांच्या तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२३,३२४,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाने पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**२) दारु पिवुन निष्काळजीपने ट्रक चालवुन पलटी झाल्याने, दोघाचा जागीच मृत्यु . :—**

दिनांक १७/०७/२०१६ रोजी ००.३० वा. दर. यातील यांनी आपल्या ताब्यातील ट्रक क्रं. युपी ९४ टी ८९८९ चा चालक तुमसर कडुन रामटेक कडे लोखंडी सलाखी भरुन घेवुन जात असतांना आरोपी ट्रक चालकाने दारु पीवुन आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ट्रक रोडखाली पलटी केला. ट्रक मधील असलेल्या सलाखी ट्रकचे कॅबीन मधुन बाहेर येवुन ट्रकचे कॅबीनच्या आत बसलेले १ विरसींग मदनसीग यादव वय ३२ वर्ष, रा. बोधपुर जिल्हा ललीतपुर २ कृष्णपाल अमृतसींग पदतार वय ३२ वर्ष रा. मेहररोही हे सलाखी खाली दबुन जागीच मरण पावले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३०४(अ),भादंवि सहकलम १८४,१८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मैसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १८/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०१ केस, तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व इतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.